Devrukh Shikshan Prasarak Mandal's
Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S. R. Sapre Commerce and Vid. Dadasaheb Pitre Science College, Devrukh. Tal.Sangmeshwar, Dist. Ratnagiri-415804
(Autonomous)

| |
|---|
| Meeting of BOS in Marathi |
| १२ मे २०२१ |

**MINUTES OF THE FIRST MEETING OF THE MARATHI BOARD OF STUDIES HELD AT NYA. TATYASAHEB ATHALYE ARTS, VED.S.R. SAPRE COMMERCE AND**
**VID. DADASAHEB PITRE SCIENCE COLLEGE, DEVRUKH(AUTONOMOUS)**

**तारीख : १२ मे २०२१**

**वेळ : १०.०० am १२.३० pm**

**Google Meet Online meeting**

**मंगळवार दिनांक १२ मे २०२१ रोजी आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुखच्या मराठी विषयाच्या अभ्यासमंडळातील सदस्यांची ऑनलाईन सभा सकाळी १० वाजता संपन्न झाली. सभेस खालील सदस्य उपस्थित होते.**

१. डॉ. वर्षा शिरीष फाटक अभ्यासमंडळ चेअरमन,
(असिस्टंट प्रोफेसर, मराठी विभागप्रमुख,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय)
२. प्रा.अजित जाधव असिस्टंट प्रोफेसर,आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय,देवरुख
३. डॉ. एल.बी.पाटील प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा जि.सोलापूर
४. डॉ. तुकाराम रोंगटे असोसिएट प्रोफेसर,पुणे विद्यापीठ मराठी विभागप्रमुख
५. डॉ. राजश्री देशपांडे असिस्टंट प्रोफेसर,फर्ग्युसन कॉलेज, पुणे
६. डॉ. नीतिन आरेकर असोसिएट प्रोफेसर,सी.एच.एम महाविद्यालय, मुंबई
७. डॉ. रणधीर शिंदे असिस्टंट प्रोफेसर,शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख
८. डॉ. निधी पटवर्धन असिस्टंट प्रोफेसर,गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी

या सभेत तृतीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यास पत्रिका क्रमांक III, V व VI च्या काही भागांची पुनर्रचना करण्यात आली.

अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा डॉ. वर्षा फाटक यांनी अभ्यासमंडळातील सदस्यांचे स्वागत केले आणि सभेच्या कामकाजास प्रारंभ करून सभेपुढील विषय व अभ्यासक्रमाची रुपरेषा सदस्यांसमोर मांडली. सभेचे कामकाज सकाळी १० वाजता सुरु झाले दुपारी १२:३० वाजता संपले. सदर सभेत झालेली चर्चा व मंजूर करण्यात आलेले ठराव पुढीलप्रमाणे -

विषयपत्रिकेवरील विषयांस अनुसरून झालेल्या चर्चेनुसार खालील ठराव मांडण्यात आले.

विषय क्रमांक १ दिनांक ७ जुलै २०२१ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

दिनांक ७ जुलै २०२१ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त प्रा. अजित जाधव यांनी वाचून दाखवले ते योग्य असल्याचे संकेत सभेकडून मिळाल्यावर पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक १ ठराव करण्यात येतो की, दिनांक ७ जुलै २०२१ रोजी झालेल्या अभ्यासमंडळाच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करून कायम करण्यात येत आहे.

सूचक: प्रा डॉ वर्षा फाटक

अनुमोदक : प्रा. डॉ. निधी पटवर्धन

विषय क्रमांक २ अ) तृतीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका साहित्य आणि समाज अंतर्गत पाचवे व सहावे सत्र पेपर क्रमांक UAMAR 53 व UAMAR 63 विषयांतर्गत साहित्यकृतींची निवड

प्रा डॉ वर्षा फाटक यांनी तृतीय वर्ष कला मराठीच्या जुन्या अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन तृतीय वर्ष कलाचा प्रस्तावित अभ्यासक्रम सर्वांसमोर चर्चेसाठी ठेवला.

या अभ्यासक्रमाचे पहिले सैद्धांतिक घटक तसेच ठेवून साहित्यकृती बदलाव्यात व त्या निवडताना विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवाहातील उत्तमोतम साहित्यकृती व सद्यस्थितीतील सामाजिक व्यवहारांची ओळख व्हावी या हेतूने काही साहित्यकृतींवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर चर्चेअंती पाचव्या सत्रात

१) महानगरीय साहित्यप्रवाह अंतर्गत जयंत पवार यांचे नाटक 'काय डेंजर वारं सुटलंय'

२) स्त्रीवादी साहित्यप्रवाह अंतर्गत नीरजा यांचा कथासंग्रह 'ओल हरवलेली माती' या साहित्यकृती व त्याचबरोबर सहाव्या सत्रात

१) ग्रामीण साहित्य प्रवाह अंतर्गत रश्मी कशेळकर यांचा ललितलेख संग्रह 'भुईरिंगण' व

२) दलित प्रवाह अंतर्गत प्रज्ञा दया पवार यांचा काव्यसंग्रह 'प्राणांतिक लयीत आरपार' या साहित्यकृती डॉ नीतिन आरेकर व डॉ रणधीर शिंदे यांनी सुचविल्या. यावर अधिक चर्चा करून त्या निश्चित करण्यात आल्या.

या विषयावर झालेल्या चर्चेअंती पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक २ अ) पुढील ठराव करण्यात येतो की,

पाचव्या सत्रात महानगरीय साहित्यप्रवाह अंतर्गत १) महानगरीय साहित्यप्रवाह अंतर्गत जयंत पवार यांचे नाटक 'काय डेंजर वारं सुटलंय'

२) स्त्रीवादी साहित्यप्रवाह अंतर्गत नीरजा यांचा कथासंग्रह 'ओल हरवलेली माती' या साहित्यकृतींची निवड करण्यात आली.

सहाव्या सत्रात ग्रामीण साहित्य प्रवाह अंतर्गत १) रश्मी कशेळकर यांचा ललितलेख संग्रह 'भुईरिंगण' व दलित प्रवाहअंतर्गत २) प्रज्ञा दया पवार यांचा काव्यसंग्रह 'प्राणांतिक लयीत आरपार' या साहित्यकृतींची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सूचक:- डॉ. नीतिन आरेकर  व डॉ रणधीर शिंदे

अनुमोदक :- डॉ. राजश्री देशपांडे

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

विषय क्रमांक ३ तृतीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका आधुनिक मराठी साहित्य UAMAR55 व UAMAR65 विषयासाठी अभ्यासक्रमाची निवड

तृतीय वर्ष कलाच्या पाचव्या व सहाव्या सत्राच्या आधुनिक मराठी साहित्य UAMAR55 व UAMAR65 विषयाच्या अभ्यासपत्रिकेतील पहिले सैद्धांतिक घटक तसेच ठेवून त्याअंतर्गत साहित्यकृती बदलाव्यात असे डॉ तुकाराम रोंगटे यांनी सुचविले. त्याप्रमाणे अशा काही साहित्यकृतींवर चर्चा करण्यात आली. व सर्वानुमते पाचव्या सत्रात १) डॉ वसंत पाटणकर यांनी संपादित केलेल्या काव्यसंग्रहातील निवडक कवींच्या निवडक कविता व २) दि.बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरी तसेच सहाव्या सत्रात १) प्रेमानंद गज्वी यांचे 'देवनवरी' हे नाटक व २) सखा कलाल यांचा 'ढग' हा कथासंग्रह या साहित्यकृतींची निवड करण्यात आली.

ठराव क्रमांक ३ पाचव्या सत्रात आधुनिक मराठी साहित्य अंतर्गत १) डॉ वसंत पाटणकर यांनी संपादित केलेल्या काव्यसंग्रहातील निवडक कवींच्या निवडक कविता व २) दि.बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरी तसेच सहाव्या सत्रात १) प्रेमानंद गज्वी यांचे 'देवनवरी' हे नाटक व २) सखा कलाल यांचा 'ढग' हा कथासंग्रह या साहित्यकृतीं अभ्यासपत्रिकेसाठी निश्चित करण्यात आल्या.

सूचक डॉ. तुकाराम रोंगटे

अनुमोदक डॉ. एल.बी. पाटील

ठराव:- हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

विषय ४ तृतीय वर्ष कला मराठी अभ्यासपत्रिका Occupational Marathi व्यावसायिक मराठी UAMAR56 व UAMAR66 विषयासाठी अभ्यासक्रमाची निवड

तृतीय वर्ष कलाच्या व्यावसायिक मराठी UAMAR56 व UAMAR66 विषयाच्या अभ्यासपत्रिकेतील पाचव्या सत्रातील सर्व घटक व सहाव्या सत्रातील 'ग्रंथपरीक्षण' या घटकातील सैद्धांतिक भाग तसाच ठेवून परीक्षणासाठी लावलेल्या साहित्यकृती तेवढ्या बदलाव्यात. त्या

अनुषंगाने मुलांना नवीन साहित्यकृती परिचित होतील. असा विचार डॉ राजश्री देशपांडे यांनी मांडला. त्यानुसार काही साहित्यकृतींवर चर्चा करून लेखक मनोज बोरगावकर यांची ‘नदीष्ट’ ही ललित कादंबरी, ना.धो.महानोर यांचा ‘पानझड’ हा काव्यसंग्रह व विठ्ठल गावस यांचा ‘फिंगर बाऊल’ हा कथासंग्रह परीक्षणासाठी लावाव्यात. असे चर्चेअंती ठरविण्यात आले.

**ठराव क्रमांक ४**

तृतीय वर्ष कलाच्या व्यावसायिक मराठी UAMAR56 व UAMAR66 विषयाच्या अभ्यासपत्रिकेतील पाचव्या सत्रातील सर्व घटक व सहाव्या सत्रातील ‘ग्रंथपरीक्षण’ या घटकातील सैद्धांतिक भाग तसाच ठेवून ग्रंथपरीक्षणासाठी मनोज बोरगावकर यांची ‘नदीष्ट’ ही ललित कादंबरी, ना.धो.महानोर यांचा ‘पानझड’ हा काव्यसंग्रह व विठ्ठल गावस यांचा ‘फिंगर बाऊल’ हा कथासंग्रह या साहित्यकृतींची सर्वानुमते निवड करण्यात आली. व ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सूचक डॉ. राजश्री देशपांडे

अनुमोदक प्रा अजित जाधव

**विषय क्रमांक ५ विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापन व सत्राच्या अखेरीस होणाऱ्या लेखी परीक्षेबाबत चर्चा**

विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ठरविताना सत्राअखेरीस ७० गुणांची लेखी परीक्षा व ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी प्रत्येक विषयपत्रिका १०० गुणांची असावी. त्यामध्ये अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाहय वाङ्मयीन उपक्रम घ्यावेत. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करत असताना मराठी या विषयाकडे विद्यार्थी जास्त संख्येने वळावेत व एकूणच विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड व समज निर्माण व्हावी, त्यातूनच त्यांना या विषयातील भविष्यातील करियर व्यवसायाच्या संधी कळाव्यात या हेतूने डॉ नीतिन आरेकर यांनी, ‘विद्यार्थ्यांना यूट्यूबवरील वेगवेगळ्या क्षेत्रांतील चांगल्या मुलाखती, तत्कालीन घडामोडींवरील व्याख्याने ऐकवावीत.’ असे सुचविले. डॉ निधी पटवर्धन यांनी, ‘विद्यार्थ्यांना ब्लॉग लेखनासाठी प्रवृत्त करावे वा वेगवेगळ्या दिनांचे औचित्य लक्षात घेऊन सर्व कार्यक्रम आयोजनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपवल्यास त्यांना संपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन कसे करावे याचे प्रात्यक्षिक मिळेल.’ असे सुचविले. तर डॉ रणधीर शिंदे व डॉ राजश्री देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन मिटिंग घेऊन त्यांना वेगवेगळ्या विषयांवर बोलते करावे. प्रश्नोत्तरे वा चर्चा आयोजित कराव्यात.’ असे सुचविले. अंतर्गत मूल्यमापनाचे वेळी विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांमधील सहभाग लक्षात घेऊन मूल्यमापन करावे. असे डॉ एल.बी.पाटील यांनी सुचविले. या विषयावर चर्चा करून पुढील ठराव मांडण्यात आला.

चर्चेअंती पुढील ठराव करण्यात येतो की,

**ठराव क्रमांक ५ विद्यार्थ्यांच्या सत्राअखेरीस घेतल्या जाणाऱ्या ३० गुणांच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये अभ्यासक्रमबाह्य वाङ्मयीन उपक्रम, चाचणी, गृहपाठ वा सादरीकरण व दोन्ही सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या परीक्षेचे स्वरूप अशारीतीने सर्वसमावेशक असावे. सध्याच्या कोरोना काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईन माध्यमातूनच अध्यापन केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आजच्या काळातील समाजमाध्यमांचे अधिकाधिक ज्ञान होणे आवश्यक आहे. त्यांना अभ्यासविषय असणाऱ्या अभ्यासपत्रिकांतील घटकांचे अध्यापनासाठी उत्तम ऑडियो व्हिडियो तयार करावेत तसेच विविध दिनांचे औचित्य लक्षात घेऊन तसे कार्यक्रम ठरवताना संपूर्ण कार्यक्रम आयोजनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपवावी व त्या कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत ब्लॉगद्वारे प्रसिद्ध करण्याचे ठरविण्यात आले. तसेच 'विद्यार्थ्यांना यूट्यूबवरील वेगवेगळ्या क्षेत्रांतील चांगल्या मुलाखती, तत्कालीन घडामोडींवरील व्याख्याने ऐकवावीत. तसेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन मिटिंग घेऊन त्यांना वेगवेगळ्या विषयांवर बोलते करावे. अभ्यासपत्रिकेविषयी प्रश्नोत्तरे वा चर्चा आयोजित कराव्यात. त्यानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावे. असे सर्वानुमते निश्चित करून ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**सूचक: डॉ. रणधीर शिंदे, डॉ एल. बी. पाटील**

**अनुमोदक : डॉ निधी पटवर्धन**

**प्रा अजित जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानून सभेचा समारोप केला.**

Annexure **१ मध्ये अभ्यासपत्रिकेबाबतचे विश्लेषण, अंतर्गत मूल्यमापनाचे विश्लेषण व तृतीय व चतुर्थ सत्राच्या अखेरीस घेतल्या जाणाऱ्या ७० गुणांच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप जोडले आहे.**

Annexure १

**Devrukh Shikshan Prasarak Mandal's**

Nya. Tatyasaheb Athalye Arts, Ved. S. R. Sapre Commerce and Vid. Dadasaheb Pitre Science College, Devrukh. Tal.Sangmeshwar, Dist. Ratnagiri-415804

(Autonomous)

Annexure 1.

**अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR53 व UAMAR63 साहित्य आणि समाज**

साहित्य आणि समाज या अभ्यासपत्रिकेच्या अभ्यासक्रम रचना तशीच ठेवून पाठ्यपुस्तकांमध्ये बदल करण्यात आला असून हा अभ्यासक्रम 2020-2021 या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आली आहे.

घटक १ साहित्य-समाज अन्योन्यसंबंध तासिका १३ श्रेयांकन १

अ)साहित्य,समाज संस्कृती या संकल्पना व त्यांच्या परस्परसंबधाचे स्वरूप

ब) साहित्य-समाज संबंध - तेन,मार्क्स यांचे सिद्धांत,मानवतावाद,मार्क्सवाद, स्त्रीवाद, आंबेडकरवाद यांचे स्वरूपविशेष

घटक २ स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य तासिका १३ श्रेयांकन १

अ) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व मराठीतील परंपरा

आ) 'ओल हरवलेली माती' या नीरजा यांच्या कथासंग्रहाचे वाचन व अभ्यास

घटक ३. महानगरी जाणिवेचे साहित्य तासिका १४ श्रेयांकन १

अ) महानगरी जाणिवेच्या साहित्याची संकल्पना आणि मराठीतील परंपरा

आ)'काय डेंजर वारं सुटलंय' जयंत पवार यांचे नाटकाचे वाचन व अभ्यास

सत्र सहावे अभ्यासपत्रिका - ३ साहित्य आणि समाज (तासिका ४० श्रेयांकने ३)

घटक १. सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य तासिका १३ श्रेयांकन १

अ) महाराष्ट्रातील सामाजिक स्थित्यंतरे आणि मराठी साहित्य- मागोवा

आ)साहित्य-समाज संबंध - गं.बा. सरदार व बाबुराव बागुल यांच्या लेखाधारे

१)संत साहित्याची सामाजिक फलश्रुती: गं.बा.सरदार

२) दलित साहित्य हे तर माणसाचे साहित्य-बाबुराव बागुल-दलित साहित्य:आजचे क्रांतीविज्ञान, दिशा प्रकाशन, नाशिक पर.आ.१९८१

घटक २. ग्रामीण साहित्य

| |
|---|
| अ) ग्रामीण साहित्य-संकल्पना व मराठीतील परंपरा<br>आ) 'भुईरिंगण' रश्मी कशेळकर यांच्या ललितलेखसंग्रहाचे वाचन व अभ्यास |
| घटक ३. दलित साहित्य<br>अ) दलित साहित्य - संकल्पना व मराठीतील परंपरा<br>आ) 'प्राणांतिक लयीत आरपार' प्रज्ञा दया पवार यांच्या काव्यसंग्रहाचे वाचन व अभ्यास |

अंतर्गत चाचणी परीक्षेचा तपशील व गुणविभागणी पुढीलप्रमाणे

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| १ | चाचणी दोन्ही सत्रांत तिन्ही घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा | १० |
| २ | गृहपाठ/ प्रकल्प सादरीकरण/चर्चासत्र गटचर्चा/अभिवाचन/<br>मराठी वाङ्मय मंडळ कार्यक्रमात सहभाग/जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग | १० |
| ३ | वर्गातील उपस्थिती | १० |

सत्रांत परीक्षा (गुण ७०)

प्रश्न १ घटक १ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न २ घटक २ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ३ घटक ३ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ४ सर्व घटकांवर आधारित प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा

तृतीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR53 व UAMAR63 अंतर्गत मूल्यमापन पाचव्या व सहाव्या सत्रात अभ्यासक्रमास नेमलेल्या घटकांवर आधारित

संदर्भ सूची


१. मराठी वाङ्मयाचा इतिहास -खंड ५ भाग १ –संपादक रा श्री जोग महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे १९७३.
२. कादंबरीविषयी हरिश्चंद्र थोरात पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००६.
३. टीकास्वयंवर -भालचंद्र नेमाडे साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९०.
४. कादंबरी एक साहित्यप्रकार हरिश्चंद्र थोरात, शब्द प्रकाशन मुंबई,२०१०.
५. मराठी वाङ्मयकोश खंड 4 समन्वयक संपादक डॉ विजया राजाध्यक्ष
६. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या डॉ आनंद यादव मेहता प्रकाशन १९७९
७. ग्रामीणता साहित्य आणि वास्तव डॉ आनंद यादव मेहता प्रकाशन १९८९
८. धार आणि काठ नरहर कुरुन्दकर १९७१
९. दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया गो म कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८६

१०. निळी पहाट रा.ग.जाधव प्राज्ञ पाठशाला वाई १९७८
११. दलित साहित्याची स्थितीगती संपादक केशव मेश्राम व इतर मराठी विभाग,,मुंबई विद्यापीठ आणि अनुभव प्रकाशन, मुंबई १९९७
१२. स्त्रीवादी समीक्षा सैद्धांतिक चौकट - डॉ मिलिंद मालशे, श्रीवणी ऑक्टोबर १९९३
१३. स्त्रीवादी साहित्य समीक्षा स्वरूप आणि व्याप्ती वसंत आबाजी धाके, श्रीवाणी ऑक्टोबर १९९३
१४. स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९३
१५. आंबेडकरवाद डॉ शेरे नीलकंठ, सुविद्या प्रकाशन, पुणे १९८५.
१६. प्रज्ञासूर्य संपादक शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन कोल्हापूर,१९९१
१७. मराठी ग्रामीण कादंबरी, डॉ. रविंद्र ठाकूर

**अभ्यास पत्रिका क्रमांक UAMAR55 व UAMAR65 आधुनिक मराठी साहित्य**

**या अभ्यास पत्रिकेच्या अभ्यासक्रमात साहित्यकृती बदलल्या आहेत**

**सत्र पाचवे**

घटक १. आधुनिक मराठी कथा तासिका १५ श्रेयांकन १
घटक २ ‘ढग’ सखा कलाल तासिका १५ श्रेयांकन १
घटक ३ आधुनिक मराठी कादंबरी १५ श्रेयांकन १
घटक ४ ‘देव चालले’ दि.बा. मोकाशी १५ श्रेयांकन १

अंतर्गत चाचणी परीक्षेचा तपशील व गुणविभागणी पुढीलप्रमाणे

सत्रांत परीक्षा (गुण ७०) वेळ २ तास ३० मिनिटे

प्रश्न १ घटक १ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)
प्रश्न २ घटक २ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)
प्रश्न ३ घटक ३ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)
प्रश्न ४ सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा (पर्यायासह)

**सत्र सहावे**

घटक 1

१. आधुनिक मराठी कविता तासिका १५ श्रेयांकन १

घटक १ डॉ वसंत पाटणकर संपादित काव्यसंग्रहातील निवडक कविता- ‘सारेच दीप कसे मंदावले आता’, आणीबाणी’(अनिल), ‘शीळ’, ‘आठवण’(ना.घ.देशपांडे) ‘भंगू दे काठिण्य माझे’, ‘न्हालेल्या जणु गर्भवतीच्या’ (बा.सी.मर्ढेकर), ‘त्रिधाराधा’,’झाडं पानात येतात’(पु.शि.रेगे), जलद भरुनी आले’, जपानी रमलाची रात्र’(बा.भ.बोरकर), ‘स्मरणी’,’मी न माझा राहिलो’(मनमोहन) ‘वेलांटी’, तिमिरात उगवली तेजाची पाऊले’(वा.रा.कांत), ‘मेंदी’,’मृण्मयी’(इंदिरा संत), ‘लमाणांचा तांडा’, ‘चढे

इमारत'(वि.म.कुलकर्णी) 'जोगिया','त्या तिथे पलिकडे तिकडे'(गदिमा), 'जात्यावरच्या ओव्या','बेडकी आणि तरुणी' (अमरशेख), 'झपताल','दंतकथा' (विंदा करंदीकर), 'पाऊसपक्षी','अडगळीची खोली' (सदानंद रेगे) 'फुंकर','बाभुळझाड'(वसंत बापट) 'काहीबाही', 'बाळे पोरीच्या जातीने'(आ.ना.पेडणेकर)

घटक २ आधुनिक मराठी नाटक १५ श्रेयांकन १

'देवनवरी' प्रेमानंद गज्वी मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

सत्रांत परीक्षा (गुण ७०)

प्रश्न १ घटक १ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न २ घटक २ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ३ घटक ३ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ४ सर्व घटकांवर आधारित प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा

तृतीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR55 व UAMAR65 अंतर्गत मूल्यमापन पाचव्या व सहाव्या सत्रात अभ्यासक्रमास नेमलेल्या घटकांवर आधारित

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| १ | चाचणी दोन्ही सत्रांत तिन्ही घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा | १० |
| २ | गृहपाठ/ प्रकल्प सादरीकरण/चर्चासत्र गटचर्चा/अभिवाचन/<br>मराठी वाङ्मय मंडळ कार्यक्रमात सहभाग/जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग | १० |
| ३ | वर्गातील उपस्थिती | १० |

अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR56 व UAMAR66 व्यवसायाभिमुख मराठी

सत्र पाचवे

श्रेयांकन ३ तासिका ४५

घटक 1 भाषांतर - सैद्धांतिक विचार

अ)

१)भाषांतर, रुपांतर, अनुवाद, अर्वाचीनीकरण या स्वरूपभेदांची चर्चा

२) ललित साहित्याचे भाषांतर - सांस्कृतिक भेदांचे , संदर्भांचे महत्त्व

आ)

१) ललित साहित्याचे भाषांतर - भाषिक समस्या व स्वरूप

२) ललित साहित्याचे भाषांतर - शैली विषयक समस्या

घटक २ भाषांतर- प्रत्यक्ष भाषांतराचा अभ्यास

१) इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर

२) मध्ययुगीन मराठीचे प्रमाण मराठीत भाषांतर

घटक ३ उताऱ्याचे आकलन (शब्दमर्यादा किमान २०० ते ३००)

सत्रांत परीक्षा (गुण ७०)

प्रश्न १ घटक १ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न २ घटक २ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ३ घटक ३ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ४ सर्व घटकांवर आधारित प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा

सत्र सहावे

श्रेयांकन ३ तासिका ४५

घटक १  मुलाखत सैद्धांतिक विचार

मुलाखत पूर्वतयारी

विविध माध्यमांसाठी मुलाखत लेखन

१) आकाशवाणी, दूरचित्रवाणी

२) वृत्तपत्र, नियतकालिके

घटक २ अ)  ग्रंथपरीक्षण

सैद्धांतिक विचार व स्वरूप

आ) ग्रंथपरीक्षण

१) 'नदीष्ट' मनोज बोरगावकर ललित कादंबरी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

२) 'पानझड' ना.धो.महानोर काव्यसंग्रह पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३) 'फिंगर बाऊल' विठ्ठल गावस कथासंग्रह, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

घटक ३ वाङ्मयीन निबंध

सत्रांत परीक्षा (गुण ७०)

प्रश्न १ घटक १ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)


प्रश्न २ घटक २ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

प्रश्न ३ घटक ३ वर आधारित १५-१५ गुणांचे दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न (पर्यायासह)

तृतीय वर्ष कलाच्या मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक UAMAR56 व UAMAR66 अंतर्गत मूल्यमापन पाचव्या व सहाव्या सत्रात अभ्यासक्रमास नेमलेल्या घटकांवर आधारित

| अनु क्र | प्रश्नस्वरूप | गुण |
|---|---|---|
| १ | चाचणी दोन्ही सत्रांत तिन्ही घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न वा टीपा | १० |
| २ | गृहपाठ/ मुलाखत /चर्चासत्र गटचर्चा/अभिवाचन/ग्रंथपरीक्षण<br>मराठी वाङ्मय मंडळ कार्यक्रमात सहभाग/जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी सहभाग | १० |

| | | |
|---|---|---|
| ३ | वर्गातील उपस्थिती | १० |



**नाव: डॉ. वर्षा शिरीष फाटक**
**चेअरमन**
**मराठी अभ्यासमंडळ**
**आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय,**
**देवरुख**
**दिनांक :- १३ मे २०२१**